**<u>ठळक बातम्या</u>**

- छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत ९ नक्षलवादी ठार
- देशात विविध ठिकाणी भारतीय वायुसेनेचा गगनशक्ती हा युद्ध सराव सुरू
- अफगाणिस्तानात भंगार गोळा करताना झालेल्या भूसुरुंगाच्या स्फोटात नऊ मुलांचा मृत्यू

**आणि**

- आयपीएलमध्ये आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा सामना लखनऊ सुपर जायंट्सशी

**<><><><><><>**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात आज सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत ९ नक्षलवादी ठार झाले आहेत. केंद्रिय राखीव दल, कोबरा बटालियन आणि जिल्हा राखीव पोलिसांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. बिजापूर जिल्ह्याच्या बस्तर विभागातील गंगापूर भागात ही कारवाई करण्यात आली. चकमकीनंतर पोलिसांना ४ नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले असून एक हलकी मशीनगन, ग्रॅनेड लाँचर आणि इतर शस्त्र आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. या ठिकाणी शोधमोहिम सुरू आहे.

**<><><><><><>**

आगामी लोकसभा आणि काही राज्यातल्या विधानसभा निवडणूकांच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक आयोगानं विशेष निरिक्षकांची नियुक्ती केली आहे. पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि बिहार या सात कोटी पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या राज्यांसाठी त्याचबरोबर विधानसभा निवडणूका असलेल्या

आंध्र प्रदेश आणि ओडिशा या राज्यांसाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्रात निवृत्त आयएएस अधिकारी धर्मेंद्र एस. गंगावार यांची विशेष सर्वसाधारण निरिक्षक म्हणून तर विशेष पोलिस निरिक्षक म्हणून निवृत्त आयपीएस अधिकारी एन.के. मिश्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**<><><><><><>**

भाजपानं आज ओडिशा विधानसभा निवडणूकीसाठी ११२ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. संभलपूर मधून जयनारायण मिश्रा यांना उमेदवारी देण्यात आली असून बालसोर मधून मानस कुमार दत्ता यांचे नाव उमेदवारांच्या यादीत आहे.

दरम्यान भाजपाचे बिहारच्या मुझ्झफरनगरचे खासदार अजय निशाद यांनी आज काँग्रेसमध्ये प्रवेश केला. भाजपानं यावेळी त्यांना उमेदवारी दिली नव्हती. नवी दिल्लीत झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमात काँग्रेस नेते मोहन प्रकाश, आणि पवन खेरा हे उपस्थित होते.

**<><><><><><>**

भारतीय वायुसेनेचा गगनशक्ती हा सर्वात मोठा युद्ध सराव सुरु आहे. कालपासून सुरू झालेला हा सराव १० एप्रिलपर्यंत चालणार आहे. पोखरण फील्ड फायरिंग रेंजसह देशभरात विविध ठिकाणी हा सराव केला जात आहे. या सरावात भारतीय लष्कराचे सुमारे दहा हजार जवान सहभागी होत आहेत. या सरावात तेजस, राफेल, सुखोई ३०, जग्वार, ग्लोबमास्टर, चिनूक, अपाचे, प्रचंड, यासह भारतीय हवाई दलाची सर्व प्रमुख लढाऊ विमानं आणि आधुनिक हेलिकॉप्टर सहभागी होऊन आपल्या क्षमतेचं प्रदर्शन करणार आहेत.

**<><><><><><>**

जम्मू आणि काश्मीरच्या मुख्य सचिवांनी यावर्षीच्या अमरनाथ यात्रेच्या तयारीसंदर्भात काल बैठक घेतली. आरोग्य विभाग, जलशक्ती, परिवहन, हवामान विभाग आणि इतर विभागांनी केलेल्या कामाचाही यावेळी मुख्य सचिवांनी आढावा घेतला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पहलगाम आणि बालटाल रस्त्यावर रस्ते विभागानं केलेल्या दुरुस्तीच्या कामाचीही मुख्य सचिवांनी माहिती घेतली. यात्रेकरूंसाठी तंबू आणि लंगर आयोजित करणे, सुरक्षित ठिकाणे निश्चित करणे याबाबतचे निर्देश त्यांनी दिले.

**<><><><><><>**

दोन हजार रुपयांच्या सुमारे ९८ टक्के नोटा परत आल्याचं रिझर्व्ह बँकेनं स्पष्ट केलं आहे. २९ मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात दोन हजारांच्या 8 हजार 202 कोटी रुपयांच्या नोटा चलनात आहेत; मे 2023मध्ये हीच संख्या तीन लाख 56 हजार कोटी रुपये होती, असं रिझर्व्ह बँकेनं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. रिझर्व्ह बँकेनं गेल्या वर्षी 19 मे रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेत दोन हजार रुपयांच्या नोटा परत घेत असल्याची घोषणा केली होती आणि नागरिकांनी आपल्याकडच्या नोटा कोणत्याही बँकेत जमा करण्याची सूचना केली होती.

**<><><><><><>**

शेअर बाजारातल्या ग्राहकांच्या तक्रारींचं निवारण करण्यासाठी सेबीनं आता स्कोर 2.0 ही नवीन ग्राहकस्नेही तक्रार निवारण प्रणाली सुरु केली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या तक्रारींचं केवळ २१ दिवसात निवारण केलं जाणार असल्याचं सेबीनं म्हटलं आहे.

सेबीनं सुरु केलेली ही नवी प्रणाली https://scores.sebi.gov.in. या संकेत स्थळावर उपलब्ध असून ग्राहकांना केवळ या नव्या प्रणालीच्या माध्यमातूनच तक्रारी करता येणार आहेत.

**<><><><><><>**

दरम्यान, देशातील संरक्षण क्षेत्रातील निर्यात 2023-24 या आर्थिक वर्षात 21 हजार कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी समाजमाध्यमांवर याबाबत माहिती दिली आहे. गेल्या आर्थिक वर्षात संरक्षण क्षेत्रातील निर्यातीत 32 टक्के वाढ झाल्याचं त्यांनी नमूद केलं. या क्षेत्रातील उत्पादन आणि निर्यात वाढावी यासाठी संरक्षण मंत्रालयानं अनेक पाऊलं उचलली असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

अरुणाचल प्रदेशमधील गावांची नावं वारंवांर बदलण्याच्या चीनच्या कृत्याचा भारतानं निषेध केला आहे. चीनच्या या गावांच्या नाव बदलण्यानं अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग असल्याच्या सत्यतेवर काहीही फरक पडणार नाही असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैसवाल यांनी सांगितलं आहे. अशा प्रकारे नावं बदलण्यानं काहीही फरक पडणार नसल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी कालचं स्पष्ट केलं होतं. अरुणाचल भारताचाच भाग होता आणि राहील असंही त्यांनी सांगितलं होतं.

**<><><><><><>**

सीमेवरील तणाव कमी होत नाही तोपर्यंत पाकिस्तानबरोबर व्यापाराची शक्यता नाही असं परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी काल स्पष्ट केलं. सुरतमध्ये दक्षिण गुजरात चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीतर्फे आयोजित परिषदेत ते बोलत होते. कोणत्याही प्रकारचा दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही, असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

काँगो च्या पहिल्या महिला प्रधानमंत्री म्हणून जूडीथ सुमिनवा तुलूका यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्राध्यक्ष फेलिक्स त्सेसेकेदी यांनी ही नियुक्ती केली आहे. आपल्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणूकीत दिलेलं वचन पूर्ण केलं असून यामुळे काँगोमध्ये सरकार स्थापन होण्याच्या दृष्टीनं हे महत्त्वाचं पाऊल उचलण्यात आलं आहे.

**<><><><><>**

अफगाणिस्तानातल्या गझनी प्रांतातल्या गेरू जिल्ह्यात रविवारी झालेल्या भूसुरुंगाच्या स्फोटात नऊ मुलांचा मृत्यू झाला. यात पाच ते १० वर्षे वयोगटातली पाच मुलं आणि चार मुलींचा समावेश आहे. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी भंगार गोळा करत असताना स्फोट झाल्यानं एका भूसुरुंगाच्या संपर्कात ही मुलं आली. अफगाणिस्तानमध्ये युद्धकाळातले भूसुरुंग आणि स्फोटकांमुळे आतापर्यंत महिला आणि मुलांसह हजारो लोक मारले गेले आहेत, जखमी झाले आहेत तसंच अपंग झाले आहेत, असं संयुक्त राष्ट्रानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

रशियाच्या आमुर भागातल्या सोन्याच्या खाणीत फसलेल्या १३ मजुरांचा मृत्यू झाला. या मजुरांचा मृत्यू झाल्यामुळे खाणीत सुरू असलेलं बचावकार्य थांबवण्यात आलं आहे. दोन आठवड्यापूर्वी या खाणीत झालेल्या भुस्खलनामुळे हे मजूर अडकले होते. जमिनीपासून १२० मीटर खोल अड़कलेल्या या मजुरांना बाहेर काढण्यासाठी बचाव कार्य सुरु करण्यात आलं होत मात्र या ठिकाणी नव्यानं भुस्खलन झाल्यामुळं या मजुरांना वाचवता आलं नाही.

**<><><><><>**

इस्रायलमध्ये सध्या सुरू असलेल्या काही वृत्त वाहिन्यांच्या प्रसारणावर बंदी घालण्याचा अधिकार काल इस्रायली संसदेनं सरकारला दिला आहे. यामध्ये

कतारच्या अल जजिरा या वाहिनीचाही समावेश आहे. अलं जजिराचं स्थानिक कार्यालय ताबडतोब बंद करण्याची प्रक्रिया सुरु केली जाईल, असं इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यान्यू यांनी म्हटलं आहे. परदेशी पत्रकारांना गाझा पट्टीत प्रवेश करण्यावर प्रतिबंध लावले जाणार आहेत. सध्या ४५ दिवसांसाठी ही बंदी करण्यात येणार असून नंतर त्यात वाढ केली जाईल. प्रधानमंत्री नेत्यान्यू यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात अलजजिराला दहशतवादी वाहिनीही म्हटलं आहे.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा सामना लखनऊ सुपर जायंट्सशी होणार आहे. बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल. काल झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं मुंबई इंडियन्सचा ६ गडी राखून पराभव केला. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना मुंबईनं निर्धारित षटकांत ९ गडी बाद १२५ धावा केल्या. तर राजस्थाननं १२६ धावांचं लक्ष गाठताना ४ बाद १२७ धावा केल्या.

**<><><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं आपल्यासाठी सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या **आजच्या** भागात आपण रामटेक लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल.

**//<><><><><><>//**